# केवळ स्टेटसमुळे कोल्हापुरात तणाव, दगडफेक

## ● पोलिसांच्या कणखर भूमिकेमुळे वातावरण निवळले
## ● राजकारणी उणे-दुणे काढण्यात मश्गुल



**सुराज्य/कोल्हापूर**

काल मंगळवारी संपूर्ण महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा सुरु असताना कोल्हापुरात मात्र काही अल्पवयीन युवकांनी दोन समजात तेढ निर्माण होईल अशा पद्धतीचे वादग्रस्त स्टेटस सोशल मीडियावर ठेवल्यामुळे कोल्हापुरात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या. शहरात तोडफोड आणि दगडफेकीच्या घटना घडल्या तर दुसरीकडे सोमवारी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर येथे हिंदू समाजावर होणारे अत्याचार आणि लव्ह जिहाद विरोधात सकल हिंदू समाजाच्या वतीने भगव्या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चानंतर परतताना काही समाज कंटकांनी संगमनेर शहराजवळील समनापूर गावातील एका समाजाच्या घरावर दगडफेक केल्याने काही काळ तणावाचे वातावरण होते. कोल्हापूर आणि नगर या दोन्ही जिल्ह्यात झालेले तणावाच्या वातावरणावर पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केल्याने पुढील अनर्थ टळला. दरम्यान या दोन्ही घटनांच्या पार्श्वभूमिवर सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत तुटून पडल्याचे चित्र पहावयास मिळाले.

मंगळवारी शिवराज्याभिषेकाच्या दिवशी कोल्हापुरातील ७-८ तरूणांनी त्यांच्या व्हॉट्सअप स्टेटसला औरंगजेब आणि टिपू सुलतान यांचे फोटो पोस्ट केले. ही बाब शहरातील हिंदुत्ववादी संघटनांच्या लक्षात येताच त्यांनी याबाबतची पोलीस ठाण्यात तक्रार केली. पण हे प्रकार शहरात किंवा राज्यात पुन्हा होऊ नये, यासाठी हिंदुत्ववादी संघटनांनकडून एकत्र येत मोर्चा काढण्यात आला. पण या मोर्चाला हिंसक वळण लागल्याने पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी लाठीहल्ला केला. सध्या शहरातील परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

बुधवारी (ता. ०७ जून) सकाळी ९ वाजताच्या सुमारास कोल्हापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हिंदुत्ववादी संघटनांनी जमून आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याची मागणी केली. आंदोलकांनी ठिय्या आंदोलन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले. मात्र, यावेळी जमलेल्या संघटना रॅली काढण्यावर ठाम होत्या. पोलिसांनी मात्र या रॅलीला परवानगी दिली नाही.

यानंतर पोलीस आणि संघटनांमध्ये बाचाबाची आणि धक्काबुक्की झाली.

त्यानंतर सकाळी साडेअकराच्या सुमारास ठिय्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्यामुळे शिवाजी चौक परिसराला लागून असलेल्या भागात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झालेले पाहायला मिळाले. यावेळी जमावाला पांगवण्यासाठी बळाचा वापर करावा लागला. पोलिसांनी सौम्य लाठीमार करत जमावाला परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी रस्त्यावर चपलांचा ढीग पडला होता.

### पुढील ३१ तासांसाठी इंटरनेट सेवा बंद

कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये यासाठी कोल्हापुरातील इंटरनेट सेवा ३१ तास बंद राहणार आहे. बुधवार सायंकाळी पाच वाजल्यापासून उद्या गुरुवार (८ जून) रात्री १२ वाजेपर्यंत इंटरनेट सेवा बंद राहणार आहे. दरम्यान कोल्हापूर शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चप्पल पडल्या होत्या. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावरील चप्पल गोळा करण्याचे काम सुरू केले.

### राजकीय नेत्यांची उणे-दुणे

● **देवेंद्र फडणवीस :** अचानक ओरंगजेबाच्या एवढ्या अवलादी कोठून पैदा झाल्या याचा शोध घ्यावा लागेल. औरंगजेबाचे फोटो जर कुणी झळकवत असेल, तर हे इथे सहन केलं जाणार नाही. या देशात, महाराष्ट्रात आमचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजच असू शकतात. कुणी औरंग्याचं नाव घेत असेल, तर त्याला माफी नाही,

● **शरद पवार :** संगमनेर आणि कोल्हापूर येथे झालेल्या दंगलीबाबत राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनी सत्ताधारी दंगलीला प्रोत्साहन देत आहे, असा आरोप केला.

● **नाना पटोले :** शिदे फडणवीस सरकार कायदा सुव्यवस्था राखण्यात सपशेल अपयशी ठरले आहे. फडणवीस गृहमंत्री असतानाच धर्मांध शक्तींना प्रोत्साहन कसे मिळत आहे?

● **छत्रपती संभाजीराजे :** शिवशाहूंच्या कोल्हापूर नगरीमध्ये औरंगजेबाचे उदात्तीकरण करणाऱ्या धर्मांध प्रवृत्तींना वेळीच चाप लावला पाहिजे. सरकारने दोषींवर कडक चार्जशीट दाखल करून इतकी कठोर कारवाई करावी, की परत औरंग्याचे उदात्तीकरण करण्याचे व सामाजिक सलोखा बिघडविण्याचे धाडस या राज्यात कुणाचे झाले नाही पाहिजे, असं छत्रपती संभाजीराजे म्हणाले आहेत.

● **अजित पवार :** राज्यकर्त्यांनी या परिस्थितीला अधिक महत्त्व देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलवून हे का वाढतंय, राज्यात काय चाललंय, हे सगळं कशामुळे होतंय, हे थांबवायला काय करायला पाहिजे ते तपासावं.

● **शंभुराजे देसाई :** कोल्हापुरात हिंसाचार सुरू झाल्यानंतर दोन ते तीन वेळा मी कोल्हापूरच्या जिल्हा प्रमुखांसोबत संपर्कात आहे. याप्रकरणी पडद्यामागे जे कोणी असतील त्यांची सखोल चौकशी केली जाणार असल्याचा सूचक इशाराही त्यांनी दिला आहे.

● **सुप्रिया सुळे :** जेव्हापासून भारतीय पक्ष महाराष्ट्रात सत्तेवर आहे, तेव्हापासून सारखंच असं वातावरण दुषित का होत आहे. काल नगरची घटना झाली आणि आज कोल्हापुरची घटना सुरु आहे. सारखंच तणावाचं वातावरण राज्यात कसं होत आहे. यामुळे राज्याचं नुकसान होणार आहे. कारण अशा गोष्टी होत राहिल्या, दंगली होत राहिल्या तर लोक गुंतवणूक करणार नाही. सर्वसामान्य जनता घाबरलेली आहे. त्यामुळे सध्या जे सुरू आहे हे गृह खात्याचे अपयश आहे.

## महत्त्वाचे वृत्त

### रिक्षा भाड्याच्या वादावरुन प्रवाशावर अत्याचार

**मुंबई :** रिक्षाच्या भाड्यावरून झालेल्या वादातून रिक्षा चालकाने ३१ वर्षीय तरूणावर अनैसर्गिक अत्याचार करून रोख रक्कम , मोबाईल व एटीएम कार्ड लुटल्याची तक्रार घाटकोपर पोलिसांकडे आली आहे. या प्रकरणी घाटकोपर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा तपास सुरू आहे. तक्रारदाराचा रिक्षाच्या भाड्यावरून एल.बी.एस रोड येथे माणिकलाल गार्डन येथे रिक्षा चालकाशी वाद झाला. त्यानंतर रिक्षा चालकाने त्याला डोक्यात सिमेंट ब्लॉकने मारहाण केली. जीवे मारण्याची धमकी देऊन तक्रारदार यांच्याकडील मोबाईल फोन, रोख रक्कम व एटीएम कार्ड काढून घेतले.

### 'नाका तेथे शाखा' स्थापन करा : राज ठाकरे

**मुंबई :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षवाढीसाठी कामाला लागण्याचे आदेश महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी पदाधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार ग्रामीण भागात कृषी विभाग आणि सहकार क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचे तसेच शहरी भागात नाका तिथे शाखा सुरू करम्ण्याचे आदेशही ठाकरे यांनी दिले आहे. रविंद्र नाट्यमंदिर येथे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ठाकरे बोलत होते.

### तरुणीची हत्या करुन सुरक्षा रक्षकाची आत्महत्या

**मुंबई :** अठरा वर्षीय तरुणीची हत्या करून एकाने आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी उजेडात आली. मरीन ड्राईव्ह येथील वसतिगृहातील ही घटना असून, तेथील सुरक्षा रक्षकाने चर्नी रोड स्थानकाजवळ गाडीखाली उडी घेत आत्महत्या केली. तरुणीवर बलात्कार झाल्याचा संशय असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. मरीन ड्राईव्ह येथील सावित्रीबाई फुले महिला छात्रालय येथील चौथ्या मजल्यावरील खोलीमध्ये ही तरुणी राहात होती. ती बेपत्ता असल्याची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी मंगळवारी संध्याकाळी तपास केला असता, खोलीतच विवस्त्र अवस्थेत तिचा मृतदेह आढळून आला. ओढणीने गळा आवळून या तरुणीची हत्या करण्यात आली. खोलीचा दरवाजा बाहेरून बंद होता. त्यामुळे बलात्कार करून हत्या करण्यात आल्याचा संशय आहे.

### जमिनीच्या वादातून हाणामारी

**पुणे :** जमिनीच्या वादातून तरुणाला बेदम मारहाण करुन त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना नगर रस्त्यावरील लोणीकंद परिसरात घडली. तरुणाच्या मोटारीची तोडफोड करुन दोन लाखांची रोकडही लुटण्यात आली. या प्रकरणी पंकज सदाशिव गायकवाड, देवीदास बाळासाहेब गायकवाड, तेजस मल्हारी गायकवाड, गजानन गुलाब गायकवाड, विजय सदाशिव गायकवाड, सोमनाथ उर्फ बाजीराव रामा गायकवाड (सर्व रा. ऊरळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे) यांच्यासह इतर आठ ते दहा जणांविरुद्ध लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सागर अशोक कुटे (वय ३४, रा. कोंढवा) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### सीमा शुल्क विभागातील दोन उपायुक्तांना अटक

**मुंबई :** केंद्रीय अन्वेष विभागाने (सीबीआय) दोन वेगवेगळ्या प्रकरणांच्या तपासादरम्यान सीमाशुल्क विभागाच्या यापूर्वी तैनात असलेल्या दोन उपायुक्तांना अटक केली. याप्रकरणी सीबीआयने मुंबई, नवी मुंबईसह सात ठिकाणी शोध मोहीम राबवली असून दोन्ही आरोपींना न्यायालयापुढे हजर केले. त्यांना ९ जूनपर्यंत सीबीआय कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी सीबीआयने यूबी सेंटर, जेएनसीएच, मुंबई येथे नियुक्त तत्कालीन सीमाशुल्क उपायुक्त दिनेश फुलदिया आणि सुभाष चंद्रा यांच्यासह खासगी व्यक्ती, दलाल अशा सहा जणांविरोधात दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवले होते.

### पुण्यात रस्त्यावर २८०० सीसीटीव्ही कॅमेरे

**पुणे :** पुणे शहर परिसरात महापालिका, पुणे पोलिसांनी १४०० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. शहरातील ज्या भागात गंभीर गुन्हे घडले आहे, तसेच महत्वाच्या ठिकाणी अतिरिक्त २८०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे शहरातील महत्वाचा परिसरावर पोलिसांनी नजर राहील, अशी माहिती पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी दिली. वानवडीतील रामटेकडी परिसरातील राज्य राखीव पोलीस दलात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमास पोलीस महासंचालक रजनीश सेठ आले होते.

### आंतरराष्ट्रीय विमानतळाचे २०२४ ला लोकार्पण

**नवी मुंबई :** आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरु करण्यासाठी डिसेंबर २०२४ मुदत देण्यात आली आहे. मात्र विमानतळ उभारणीचा वेग पाहता हा प्रकल्प मुदतीपूर्व मे २०२४ पर्यंत पूर्ण होईल अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाची हवाई पाहणी केल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. पुढील वर्षी लोकसभा निवडणुकी पूर्वी या प्रकल्पाचे लोकार्पण करण्याचा शासनाचा प्रयत्न असून मुंबई ट्रान्स हार्बर लिंकच्या शिवडी न्हावा शेवा प्रकल्पाचे लोकार्पण पंत्रधानपद नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याचा प्रयत्न असल्याचे या कामाला अधिक गती देण्यासाठी ही पाहणी करण्यात आल्याचे समजते.

### लाच स्वीकारताना पीएसआय जाळ्यात

**नाशिक :** पोलीस कारवाईत मदत करण्याच्या मोबदल्यात चार हजार रुपयांची मागणी करून त्यातील तीन हजार रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताना येवला तालुका पोलीस ठाण्यातील सहायक उपनिरीक्षक विजय शिंदे यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. शासकिय विभागांमध्ये लाचखोरींची जणू स्पर्धा लागल्याचे चित्र आहे. यामध्ये बड्या अधिकाऱ्यांपासून ते वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांचा सहभाग मागील काही महिन्यांतील यशस्वी सापळ्यांमधून अधोरेखीत होत आहे.

## मोदी सरकारमधील नितीन गडकरी शरद पवारांचे आवडते मंत्री

**सुराज्य/औरंगाबाद**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी वेळोवेळी विविध मुद्द्यांवर केंद्रातील मोदी सरकारवर शाब्दिक हल्ला चढवला आहे. राज्यातही महाविकासआघाडीकडून सत्ताधारी भाजपा-शिंदे गटावर सडकून टीका होते. अशातच पत्रकारांनी शरद पवारांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील सरकारच्या ९ वर्षांच्या कालखंडात मंत्रिमंडळातील कोणता नेता आवडतो असा प्रश्न विचारला. यानंतर शरद पवारांनी मोदी सरकारमधील आवडत्या नेत्याचं नाव सांगत कारणंही नमूद केली. ते बुधवारी (७ जून) औरंगाबादमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. शरद पवार म्हणाले, काही लोकांचं काम चांगलं आहे. उदाहरणार्थ नितीन गडकरी. मी पाहतो की, त्यांना विकासाच्या कामात रस आहे. शेवटी शासन तुमच्या हातात आल्यावर सरकारने काही तरी 'रिझल्ट' दिला पाहिजे. त्यात नितीन गडकरी पुढे आहेत.

## उद्धव ठाकरेंना मोठा धक्का; शिवसेना भवनातील टीम शिंदेंच्या गळाला

**सुराज्य/मुंबई**

एकनाथ शिंदे यांनी काही आमदारांना सोबत घेत शिवसेनेतून बंडखोरी केली. पुढील काही दिवसात या बंडखोरीला वर्ष होईल. वर्ष पूर्ण व्हायच्या आधीच शिवसेना पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदेंनी मिळवले.

याशिवाय राज्यभरातून ठाकरे गटाचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि महत्त्वाचे नेते शिंदे गटात प्रवेश करत आहेत. त्यामुळे अस्तित्त्वाची लढाई लढत असलेल्या उद्धव ठाकरेंना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. शिवसेना भवनातील टीमने शिंदे गटात प्रवेश केला आहे.

ठाकरे गटाच्या सभा, कार्यक्रम आणि सोशल मीडियावरील प्रचाराची धुरा सांभाळणाऱ्या शिवसेना भवनातील कर्मचाऱ्यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडत शिंदे गटात प्रवेश केला आहे. चांदिवली येथील एका जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपास्थितीत या कर्मचाऱ्यांनी प्रवेश केला.

ठाकरे कुटुंबीयांचे निकटवर्तीय आणि सचिव अनिल देसाई यांचा विश्वासू असलेला कट्टर शिवसैनिक अशी ओळख असलेल्या अमोल मटकर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. अमोल मटकर यांच्यासोबत अमित शिगवण, अविनाश मालप, प्रथमेश चाचले यांनीही शिंदे गटात प्रवेश केला आहे.

### अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारा कार्यकर्ता

शिवसेनेचे इव्हेंट्स, सोशल मीडिया आणि डिझायनिंग टीममध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारा कार्यकर्ता म्हणून अमोल मटकर यांनी पक्षात ओळख होती. दरवर्षी दसरा मेळावा, शिवसेना पक्षाचा किंवा मार्मिकचा वर्धापन दिन या कार्यक्रमांच्या आयोजनांसह मंचावरच्या बॅकड्रॉप पासून संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी अमोल मटकर यांच्यावर असायची. याशिवाय पक्षाचे पोस्टर्स, बॅनर्स, सोशल मीडियावरील मिम्स, कार्ड्स, फोटोज आणि व्हिडिओजच्या डिझायनिंगच्या कामात ते महत्वाची भूमिका बजावत होते.

## महापारेषणच्या माध्यमातून विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर : डॉ. कुमार

**सुराज्य/मुंबई**



''महापारेषणच्या माध्यमातून विविध प्रकल्पांची कामे अतिशय वेगाने सुरू असून ती प्रगतिपथावर आहेत. सुधारित ठेथ धोरणामुळे शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळणार आहे. महापारेषणकडून वाहिनी उभारताना संबंधित जमीन मालकास जमिनीची नुकसान भरपाई (ठेथ), पिकांची व झाडांची नुकसान भरपाईचा मोबदला देण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी महापारेषणच्या खात्यातून रक्कम थेट जमीन मालकाच्या खात्यात जमा होणार आहे.'', असे प्रतिपादन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या १८ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात डॉ. संजीव कुमार बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे उपस्थित होते.

सुरूवातीला उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणला दूरदृश्य प्रणालीव्दारे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा संदेश दिला. प्रास्ताविकात महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे म्हणाले, ''कंपनीची संस्कृती व कर्मचाऱ्यांमध्ये एकसंघ वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येणे, सकारात्मक विचारांची देवाणघेवाण करणे, मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करून कंपनीचा विकास साधावा, या हेतूने महापारेषणतर्फे कंपनीचा १८ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा त्यामागचा हेतू आहे.

डॉ. संजीव कुमार म्हणाले, ''देशात अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात मोठी संधी आहे व आव्हाने आहेत. पाच हजार मेगावॉटपेक्षा जास्त ऊर्जा तयार करण्यासाठी एक हजार सर्किट किलोमीटर अति उच्च दाब पारेषण वाहिनी सुरू करण्याचे धोरण आहे. महापारेषण ही देशात सर्वोत्तम पारेषण कंपनी आहे. महापारेषणने ड्रोनचा वापर सुरू केला आहे. हा ड्रोनचा वापर हा विशेषतः दुर्गम भागातील अति उच्च दाब वाहिन्यांचे वेळेवर सर्व्हेक्षण व देखरेख करण्यासाठी चांगला निर्णय ठरला आहे. महापारेषणच्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उपविभाग स्तरापासून सांघिक कार्यालय स्तरापर्यंत पुरस्कार योजना सुरू केली आहे. भविष्यातही अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही पुरस्कार योजना चालू राहील.''

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन, मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता (प्र.) श्री. योगेश पाचपांडे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला राज्यातील विविध परिमंडळातील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. विनायक शिंदे यांनी केले तर आभार कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) श्री. शशांक जेवळीकर यांनी मानले.

## संतोष भंडारी यांना राष्ट्रीय दृष्टीहीन संघाचा पुरस्कार प्रदान



**सुराज्य/पुणे**

आळंदी येथील जागृती अंध कन्या विद्यालयात राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राच्या ४६ व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिसाठी पुरस्कार वितरणाचा सोहळा संपन्न झाला. यामध्ये समाजसेवा पुरस्कारासाठी सोलापुरातलि भैरूरतन दमाणी अंधशाळेचे सचिव संतोष शांतीलाल भंडारी यांना लेफ्टनंट जनरल जी. एल.नर्डकर यांच्या सन्मानार्थ ११ हजार रुपय, मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.


याप्रसंगी उद्योजक भंवरलाल कांकरिया, प्रतिभाताई मोडक, अंधाच्या आनंद आटलेकर आदींच्या उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष प्रो. लक्ष्मण खापेकर यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार भंडारी यांना प्रदान करण्यात आला.

पुरस्काराविषयी संतोष भंडारी यांनी आजपर्यंत केलेल्या अंधजणांनसाठीच्या कार्याचे खरे समाधान वाटले, अशी भावना व्यक्त केली व पुरस्काराची रक्कम ११ हजार रूपये संघटनेस परत केले तसेच स्वत:तर्फे १० हजार रूपये राष्ट्रीय दृष्टीहीन संघास देणगी दिली.

यावेळी त्यांच्या पत्नी सौ. छाया भंडारी, डॉ.प्रदीप गांधी, सौ. कविता गांधी, डॉ. जवाहर भळगट, डॉ. अलका भळगट, दमाणी अंधशाळेचे मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे, राजकुमार पाटील, कु. प्रतक्षा जाधव, सौ. भाग्यश्री पावटे, संतोष गबांडकर, भास्कर शिखरे, संजय पाटील, निवृत्ती जगताप, सुरेखा कारंडे, सरस्वती पवार, कविता नबगिरे, अर्चना करकमकर तसेच राष्ट्रीय दृष्टीहीन संघाचे उपाध्यक्ष सिध्देश्वर बिराजदार, राजू शेळक, प्रभाकर कदम आदी उपस्थित होते. हा पुरस्कार सोहळा जागृती अंध कन्या विद्यालय देवाची आळंदी, पुणे येथे संपन्न झाला.

# मुख्यमंत्र्यांच्या रेसमध्ये कोण?, ज्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा ते!

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा 'मविआ'ला टोला



**सुराज्य/नगर**

'बापात बाप नाही अन् लेकात लेक नाही' अशी महाविकास आघाडीची अवस्था आहे. मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न अनेकजण बघत आहेत. त्याऐवजी आघाडीने जागा वाटपावर लक्ष केंद्रित करावे, खुद्द शरद पवार महाविकास आघाडीतील जागावाटप पुढे सरकत नसल्याची खंत व्यक्त करतात, परंतु हा विषय भिजत ठेवायचा आणि दुसरीकडे मुख्यमंत्रीपदाच्या दावेदारांची चर्चा करायची हा एक 'गेम' सुरू आहे, त्यामागे ज्यांची चौकशी सुरू आहे तेच मुख्यमंत्रिपदाचे दावेदार दिसत आहेत, असा टोला वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नगरमध्ये लगावला.

शेवगाव येथील दंगलीच्या पार्श्वभूमीवर ॲड. आंबेडकर यांनी आज, मंगळवारी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेतली. वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांना राजकीय दुश्मनीतून गुन्ह्यात गोवण्यात आले, घटनेच्या दिवशी ते औरंगाबादमधील कार्यक्रमात होते, हे आपण पोलीस अधीक्षकांच्या निदर्शनास आणून दिल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी ॲड. दीपक शामदिरे, विष्णू जाधव, प्रभाकर बकले, नितीन सोनवणे, पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर, कुणाल सरोदे, प्रतीक बारसे, योगेश साठे आदी उपस्थित होते. त्यानंतर ॲड. आंबेडकर पत्रकारांशी बोलत होते. अहमदनगरला अहल्यानगर नाव देण्यात गैर काहीच नाही, अहल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव जिल्ह्यात आहे. होळकर घराण्याचे राज्य त्यांनी पुढे चालवले. परंतु त्यांच्या प्रशासकीय व लष्करी कौशल्याची चर्चा होत नाही तर त्या देवभोळ्या होत्या असे चित्र निर्माण करणे त्यांच्यावर अन्यायकारक आहे असे मला वाटते.

### वातावरण खराब करण्याचा प्रयत्न

महाराष्ट्रात गेल्या चार वर्षांत ३५ हजार महिला गायब झाल्या आहेत. परंतु त्यांच्यावर राजकारण सुरू आहे. त्या सर्व लव जिहादद्वारे गायब झाल्याचा प्रचार सुरू आहे. प्रेम नैसर्गिक आहे, हे प्रथम मान्य केले पाहिजे. त्याला लव जिहाद नाव देऊन वातावरण खराब करणे योग्य नाही. दोघांतील संमतीवर बोट ठेवण्याचा अधिकार इतरांना नाही, असेही प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered contractors of MSETCL. **RFx No. 7000027489 RE-Tender No.** SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:08/2023-2024 **Particulars:** Work of Providing & Fixing of Breather with Silica Gel for Power Transformer ICT's available at 220/132 kV Substation under EHV O&M Circle, Solapur. **Estimated Cost:** Rs. 20,00,000/- **EMD (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 20,000/- **Tender Cost:** Rs. 500/- + GST **Sale Period:** 08.06.2023 to 15.06.2023 **Last Date of Submission:** 15.06.2023 up to 23:59 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 16.06.2023 at 12:00 Hrs (If possible). **Contact Person:** Superintending Engineer - 7447440608. For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**PRE-BID Meeting: 12.06.2023 @ 12:30 pm at EHV O&M Circle Solapur.**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Solapur**